**आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार**



2008-09 Golden Jubilee Year

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद

तमसो मा ज्योतिर्गमय

1958 - 2008

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद

देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद

50 सुवर्ण महोत्सवी वर्ष २००८-२००९

# देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र, औरंगाबाद आणि यु.जी.सी. च्या साहाय्याने**

**राष्ट्रीय चर्चासत्र**

## ''आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान''

**दिनांक ७ व ८ मार्च २००९**

# प्रमाणपत्र

श्री/श्रीमती/प्रा./डॉ. आवाड विश्वनाथ महादेव

महाविद्यालयाचे नांव सहकारमहर्षी शंकरराव मोहितेपाटील महाविद्यालय, अकलूज.

यांनी / हिने देवगिरी महाविद्यालयातर्फे आयोजित यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र, औरंगाबाद आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने दि. ७ व ८ मार्च २००९ रोजी घेतलेल्या ''आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान'' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात सक्रीय सहभाग घेतला.

या राष्ट्रीय चर्चासत्रात यशवंतराव चव्हाण: राजकारणाची दिशा आणि परिपूर्ती या विषयावरील निबंधाचे सादरीकरण केले, त्याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| (प्रा. अशोक नाईकवाडे)<br>संयोजक - राष्ट्रीय चर्चासत्र<br>राज्यशास्त्र विभागप्रमुख (पदवी - पदव्युत्तर)<br>देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद. | (डॉ. प्रदीप जबदे)<br>प्राचार्य,<br>देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद. | (श्री. सचिन मुळे)<br>कोषाध्यक्ष - यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान<br>विभागीय केंद्र, औरंगाबाद. |

यशवंतराव चव्हाण : राजकारणाची दिशा आणि परीपुर्ती

१२ मार्च १९१३ सातारा जिल्हा देवराष्ट्रे जन्म ते २७ नोव्हेंबर १९८४ कराड कृष्णा काठ प्रितीसंगम अंत्यसंस्कार ही एक ओळ असली तरी मधला जो कालखंड आहे तो काळ आणि त्या काळामध्ये यशवंतरावांनी केलेले कार्य महाराष्ट्रातील एकाही नेतृत्वाला अदयापी जमलेले नाही .

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ते देशाचे उपपंतप्रधान ही पदे कुणाच्या शिफारशीने मिळाली नाहीत तर यशवंतरावांनी कर्तृत्वाने मिळविली एव्हढेच नाही तर त्यांना बोलावून दयावी लागली मानवी जिवनात समाजात. राजकारणात कधी कधी उन्निस विस होते तेही दिवस यशवंतरावांच्या वाटयाला आले पण कोणत्याही परिस्थितीत डगमगून न जाता संकटाचा मुकावला समर्थपणे कसा कारावा याचे उत्तम उदाहरण यशवंतरावांनी आपल्या कामगिरीने दाखवून दिले .

धर्म, जात, भाषा पंथ याआधारे निर्माण झालेला भारत हा छोटया छोटया वर्तुळांचा देश या वर्तुळाच्या निष्ठासुध्दा ठराविक व्यक्तीभोवतीच केंद्रित झालेल्या पण त्यामुळे देशाकडे पाहण्याची वेळ व उसंत कुणाकडे नव्हती परिणाम १९६२ च्या युध्दामध्ये भारताला मानहानी पत्करावी लागली . प्राप्त परिस्थितीमध्ये तात्कालीन सरंक्षण मंत्री मेनन अपयशी ठरले त्याच्या पडसाद कॉग्रेस मध्ये उमटले मेनन यांची कार्यक्षमते विषयी चर्चा सुरू झाली पण पंडीत नेहरूंचा त्यांच्यावर अजुनही विश्वास होता पण देशातील व पक्षातील दवावा मुळे त्यांनी संरक्षण खाते स्वतः काडे घेतले पण तेवढयाने चर्चा थांबली नाही संरक्षण खाते दुसरा एकादया सक्षम व्यक्तीकडे असावे असा सुर निघू लागला .

चीन युध्दामुळे देशाच्या संरक्षण व्यवस्थेचे व परराष्ट्र धोरणाचे वाभाडे निघाले होते पण सत्ताातूर असलेल्यांना त्याचे काही देणे नव्हते या विकट परिस्थितीत या खात्यासाठी काहींनी जोरदार आग्रह धरला होता देशाच्या संरक्षणाचा विचार त्यांच्या काडे होता का नाही हे माहित नाही पण खाते मात्र हवे होते यामध्ये गुजरातचे मोराराजी देसाई, ओरिसाचे विजू पटनाईक, कृष्णमाचारी हे आग्रही होते संवधितांनी पंतप्रधानांकडे या खात्याची मागणिही केलेली होती

६ नोव्हेंबर १९६२ रोजी नेहरूंनी यशवंतरावांना फोन केला आणि विचारले तुम्हाला संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीत यायला आवडेल का . त्यावेळी यशवंतरावानी नम्रपणे सांगितले याखात्याविषयी मला काहिच माहिती नाही त्यासाठी थोडासा कालावधी लागेल . नेहरूच्या सांगण्यावरून यशवंतराव दिल्लीला गेल संरक्षण खात्याची सुत्रे घेतली २० नोव्हें रोजी विजु पटनाईक यांनी यशवंतरावांची भेट घेतले आणि त्यांना सांगितले की तुम्ही मुंबईतून संरक्षण खात्याचा काराभार करू शकला असता कारण चीनी सैन्य लवकरच मुंवई पर्यत पोहोचतील त्याचप्रमाणे संरक्षण सिध्दतोविषयी तुमच्या योजना काय आहेत यावर यशवंतरावांनी शांतपणे उत्तर दिले मला याचा अनुभव नाही हे जरी खरे असले तरी परमेश्वर कृपेने काहितरी करून दाखवेन आणि त्याच रात्री चिनने एकतर्फी युध्दवंदी केली यशवंतराव संरक्षणमंत्री होणे आणि चीनची माघार या गोष्टी निव्वळ योगायोगाच्या असल्यातरी एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे ती म्हणजे देशाच्या संरक्षण सिध्दतेमध्ये अक्षम कुचराई आणि या पदावर वसू इच्छिणारे लोक यांची मानसिकता काय होती .

अत्यंत प्रतिकूल परिस्थीतीत ते देशाचे संरक्षणमंत्री झाले आणि या पदाची व देशाच्या संरक्षण सिध्दतेची गरज ओळखून त्यांनी काहि महत्वाचे निर्णय घेतले त्याचे दुरगामी परिणाम आजही दिसताहेत .

१ . तात्कालीन संरक्षणमंत्री मेनन यांच्या अनेक निर्णयामुळे लष्कराची शिस्त विघडून गेलेली होती लष्करी सत्ता पदसोपान रचनेनुसार अग्रार्थी असायला हवी पण मेनन यांनी चर्चा विचार विनीमय करताना सैन्यातील प्रमुख अधिकारी वर्गाला विश्वासात न घेता त्यांच्या पेक्षा कमी हुददा असलेल्या अधिकारी वर्गाशी सल्लामसलत करून अनेक निर्णय घेतले त्याचा परिणाम लष्करी अधिकारी वर्गामध्ये एकमेकावददल अविश्वासाचे वातावरण निर्माण झालेले होते यशवंतरावांनी या सर्वाना विश्वासात घेवून त्यांच्या कार्यपध्दतीवर विश्वास ठेवून कार्याला सुरवात केली . गटवाजी, गुप्तता संपविली राम प्रधान आपल्या डिवॅकल टू रिव्हायव्हल या पुस्तकात म्हणतात यशवंतरावांनी वेगवेगळया प्रकरणी अधिकारी वर्गामध्ये विश्वास निर्माण केला . वेल्स हॅनान या अमेरिकन लेखकाने आफ्टर नेहरू हू या ग्रंथात म्हटले आहे की यशवंतराव यांच्या एव्हढी अधिकारी वार्गाकडून काम करून घेणे त्या काळात कुणालाही जमले नाही .

२ . चीन युध्दाच्या काळात लष्करी अधिकारी वि . एम . कौल यांच्या कार्यावावत आणि अकार्यक्षमतेवावत खुप चर्चा झाली पण त्यांना पदावरून काढून टाकणे कुणाला शक्य झाले नाही यशवंतरावांनी कौल यांची सविस्तर चौकशी केली आणि त्याना तात्काल निलंवीत करण्याचा शेरा मारला व फाईल नेहरूंकडे पाठवून दिली अनेक लोकांचा समज होता नेहरू मंजूर करणार नाहित पण त्यांनीही मंजूर केली यावरून यशवंतरावांची निर्णय घेण्याची क्षमता दिसून येते .

३ . चीन युध्दाने खचलेल्या लष्कराचे मनोधैर्य वाढविणे खुप गरजेचे होते हे ध्यानात घेवून यशवंतरावांनी लडाख, असाम या ठिकाणच्या लष्करी ठाण्याला भेटी दिल्या त्यांच्या मध्ये अश्वासक वातावरण निर्माण केले

४ . चीन युध्दाच्या निष्कर्पामध्ये आम्ही संरक्षण सिध्दतेमध्ये कमी पडलो असा निष्कर्प हेन्डरसन व बुक्स समितीनी काढला . यशवंतरावांनी लष्कराची पुर्नरचना केली आणि पश्चिम वंगाल मध्ये इशापूर याठिकाणी स्वयंचलीत वंदूका निर्मीतीचा व मिग जातीच्या विमान उत्पादनाचा कारखाने ओरिसातील कोरापूर व महाराष्ट्रातील नासिक या ठिकाणी सुरू केले .

५ . संरक्षण मंत्री झाल्यानंतर यशवंतरावांनी तिन्ही दलांच्या प्रमुखांची रोज सकाळी बैठक घेण्याची पध्दत सुरू केली त्यांचा परिणाम खूप चांगला झाला निर्माण होणारे अनेक प्रश्न चुटकीसरशी सुटू लागले अनेक प्रश्नावर तोडगा निघू लागला .

६ . १९६५ मध्ये पाकिस्तान वरोवर झालेल्या युध्दात कशा पध्दतीने मुकावला कारायचा याची योजना पंतप्रधान लाल वहाददूर शास्त्री आणि लष्करी अधिकारी यांना घेवून केली त्याचा परिणाम देशाला माहित आहे या युध्दात पाकिस्तानी रणगाडे मोठया प्रमाणात पंजाव व काश्मिर प्रांतामध्ये आगेकूच करीत पुढे येत होते त्यावेळी हवाई दलाचा वापर करण्याचा त्यांचा निर्णय अतिशय महत्वाचा ठरला .

७ . १९६५ च्या युध्दामध्ये अमेरिकेने पुर्णपणे पाकिस्तानला सहकार्य केले पण मानसिकदृष्टया ते पाकला सक्षम करू शकले नाहीत याउलट भारताच्या तिन्ही दलाचे मनोधैर्य उंचावून त्यांना प्रोत्साहन देवून पाकिस्तानचा पराभव केलाच पण चिन युध्दामध्ये गमावलेले लष्कराचे नितीधैर्य पुन्हा परत निर्माण केले .

८ . संरक्षण विभागासाठी यशवंतरावांनी संरक्षणाची पंचवार्षीक योजना सुरू केली .

संदर्भ ः


१. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव ः संपादन प्रा. अशोक नाईकवाडे
२. यशंवतराव चरित्र ग्रंथ ः गोविंद तळवळकर
३. www.ides.in/kevsdeeches/indias foreign policy future options
४. विचारांचा सहयाद्री यशवंतराव ः नवशक्ती मासिक
५. डॉ. भावना पाटोळे यांचा प्रबंध लेखन
६. महाराष्ट्र धर्माचे प्रणेते ः यशवंतराव चव्हाण ः न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी



प्रा. विश्वनाथ महादेव आवड
शंकरराव मोहिते महाविद्यालय. अकलूज
राज्यशास्त्र विभाग प्रमुख